**प्रतिवादीतर्फे सा.क्र. २ चा सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. के. आर. घाडगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. १०० मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून दाखवल्यावर मी त्यावर निशाणी अंगठा केला आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. तनपुरे यांच्यामार्फत :-**

२. मला वादी प्रतिवादी यांच्या वहितीच्या जमिनीची माहिती आहे. मी प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ४ असून माझ्याविरूध्द दावा एकतर्फा झालेला आहे. वादी प्रतिवादी यांच्या वाटपात कोणाला किती जमीन आली हे मला सांगता येणार नाही. वादीचा गट क्र. ५१/१ आहे. मला वादीच्या गटाच्या चतु:सिमा सांगता येणार नाही. वादीच्या जमिनीच्या पश्चिमेला रस्ता असून त्याच्या पश्चिमेला माझी जमीन असून त्यामध्ये गायीचा गोठा आहे. मयत वादी व आम्ही एकाच घरातील आहे. मला नेमके नाते सांगता येणार नाही. वादी प्रतिवादी यांचे वाटप कधी झाले हे मला निश्चित सांगता येणार नाही. माझ्या जमिनीचा गट क्र. ५१/१ मध्ये २० गुंठे जमीन आहे. गट क्र. ५१/१ मध्ये वादी यांचे नेमके किती क्षेत्र आहे हे मला सांगता येणार नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ५१/१ मधील वादीच्या मालकिची असल्याचे तो भासवत असल्याचे मी खोटे सांगत आहे. सदर विहीर वादी प्रतिवादी यांच्यात सामाईक आहे. वादी यांनी प्रतिवादीला विहिरीतुन पाणी घेण्याच्या हक्काला कधीही त्रास दिला नाही. वादी यांच्या जमिनीच्या दक्षिणेला काळे यांची जमीन असून त्यामध्ये पुर्व-पश्चिम बांध आहे. सदर बांधावर नारळाची, लिंबाची व चिंचेची झाडे आहेत. वादी व प्रतिवादी चंद्रकलाबाई यांच्या जमिनीमध्ये दक्षिणोत्तर बांध आहे. दि. १५/११/२०११ रोजी वादी व प्रतिवदी क्र. १ ते ३ यांच्यात असलेला दक्षिणोत्तर बांध प्रतिवादींनी फोडला व त्यांच्यात भांडण झाले. मी आजरोजी प्रतिवादी क्र. २

चंद्रकला यांच्यासोबत न्यायालयात आलो. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी क्र. २ हिने न्यायालयात कशी साक्ष द्यायची याबद्दल सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ यांच्या सांगण्यावरून न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.01.29 17:44:20 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-२९/०१/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.